**शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१**
**१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१**
दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

महत्त्वाचे

**जा.क्र.शिउसं/उमाशि-३/११ वी/पुवि/२०१६**/ ९६९७
दिनांक :- 8 JUN 2016

**प्रति,**

शिक्षणाधिकारी
माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग
पुणे महानगरपालिका

विषय: व्यवसाय शिक्षण लेव्हल २ घेऊन इयता १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्याचे
इ.११वी चे प्रवेश ऑफ लाईन प्रवेश करणेबाबत

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत व्यवसाय शिक्षण माध्यमिक स्थर या योजनेमध्ये राज्यात सन २०१४-१५ पासुन व्यवसाय विषय माध्यमिक व उच्चमाध्यमिक स्तरांवर सुरु करण्यास केंद्र शासनाने परवानगी दिलेली आहे. त्या नुसार राज्यात सन २०१५-१६ पासुन या योजनेच्या अंमलब्जाव्णीस सुरवात झालेली आहे.सन २०१४ -१५ मध्ये तत्कलीन मा.सचिव शालेय शिक्षण यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार राज्यातील पुणे महानगरपालिकेच्या ८ शाळामध्ये मल्टी स्किल व रिटेल हे विषय सुरु करण्यात आले आहेत.

National Qualification Framework वर आधारित राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियाना अंतर्गत सुरु करण्यात आलेले व्यवसाय शिक्षण लेव्हल ३ निवडणाऱ्या विध्यर्थ्याना ऑफलाईन पद्धतीने कला, विज्ञान किं वाणिज्य शाखेमध्ये महाविद्यालयात प्रवेशा करिता अर्ज करता येणार आहे. तथापि या विद्यार्थ्यांना पुढील व्यवसाय शिक्षण लेव्हल ३ व ४ उपलब्ध करुन देणेसाठी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या पाच शाळामध्ये व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान या कायार्लयाने मान्यता दिली आहे. त्या नुसार मल्टी स्कील व रिटेल व्यवसाय शिक्षण हा विषय घेऊन १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्याचे इ.११वी चे प्रवेश ऑफ लाईन पद्धतीने करण्याची परवानगी देण्यात येत आहे. तरी आपण आपल्या स्तरावर तत्काळ संबधित शाळांना कळवावे.

MRaut 8.6.16
(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर.**
१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे